**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत**
**ग्राम रोजगार सेवकांचे मानधन**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- मग्रारोहयो २०१०/प्र.क्र.४८/रोहयो-१०**
**मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक : १ मार्च,२०१४**

संदर्भ- १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो-२००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दि.१९/१०/२००६

२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४८/रोहयो-१०, दि.५ जून,२०१०

३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. मग्रारोहयो-२०११ /प्र.क्र.४०/रोहयो-१०-अ, दि.२ मे,२०११

**प्रस्तावना:**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्राम सेवकाला मदत करण्यासाठी ग्राम रोजगार सेवक यांच्या सेवा ग्रामपंचायतीमार्फत घेण्यात आल्या आहेत व त्यांच्या सेवा महत्वाच्या आणि उपयुक्त ठरल्या आहेत.

२. ग्राम पंचायत अथवा कार्यान्वयीन यंत्रणेमार्फत झालेल्या एकूण कामाच्या खर्चापैकी ग्राम रोजगार सेवकाचे मानधन योजनेंतर्गत मजुरी प्रदानाच्या खर्चाच्या ०.७५% वरुन २.२५% इतके दि. ५ जून,२०१० च्या शासन निर्णयान्वये वाढविण्यात आले होते.

३. सद्यस्थितीत कामाचे प्रमाण जास्त असणा-या ग्रामपंचायतीत त्यांना सद्याच्या २.२५% दराने समाधानकारक मानधन मिळत आहे. परंतु कमी मनुष्य दिवस निर्मिती किंवा पुरेशी कामे नसणा-या ग्रामपंचायतीमध्ये त्यांना पुरेसे मानधन मिळत नाही ही बाब निदर्शनास आली आहे. ग्राम रोजगार सेवकाचे काम हे अर्धवेळ स्वरुपाचे असले तरी त्यांना समाधानकारक मानधन मिळणे आवश्यक आहे.

४. या पाश्र्वभुमीवर ग्राम रोजगार सेवकांना मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील टास्क फोर्स समितीच्या शिफारशी व मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार ग्राम रोजगार सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत राज्यात कार्यरत असलेल्या ग्राम रोजगार सेवकांना खाली नमूद केलेल्या सुत्रानुसार ग्राम रोजगार सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

| एकूण वार्षिक मनुष्य दिवस | सद्याचा मानधनाचा दर | सुधारीत मानधनाचा दर |
|---|---|---|
| **१०००** मनुष्य दिवस पर्यंत | एकूण मजुरी प्रदानाच्या खर्चाच्या **२.२५%** | एकूण मजुरी प्रदानाच्या खर्चाच्या **६%** |
| **१००१-२०००** मनुष्य दिवस | **२.२५%** | **४%** |
| **२०००** पेक्षा अधिक मनुष्य दिवस | **२.२५%** | **२.२५%** |

२. याकरिता होणारा खर्च केंद्र शासनाच्या ६% प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध होणा-या निधीतून भागविण्यात यावा. तथापि, अतिरिक्त निधीची आवश्यकता भासल्यास राज्य मंत्रिमंडळाच्या मे,२०१० मध्ये झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे, राज्य रोहयो निधीतून ३% प्रशासकीय खर्चाच्या निधीतून हा अतिरिक्त खर्च भागविण्यात येईल.

३. हे सुधारित दर या वर्षापासून (सन २०१३-१४) अंमलात येतील.

४. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र आयुक्तालय, नागपूर यांनी या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्राम रोजगार सेवकांना अदा करावयाचा मानधनाचा सुधारित दर लागू करण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करावी. तसेच या अनुषंगाने याबाबत शीघ्र गणक ( Ready Reckoner) तयार करुन संबंधितांना उपलब्ध करुन द्यावा.

५. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे प्राधान्याने सांभाळून, ग्राम विकास/ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना आवश्यक असल्यास ग्राम रोजगार सेवकांच्या सेवा ग्रामसभा प्रवर्तक तसेच जल सुरक्षक/जल स्वराज्य सेवक म्हणून घेऊ शकतील. तथापि, त्या प्रित्यर्थ त्यांना अनुज्ञेय असणारे मानधन त्या विभागामार्फत अदा करण्यात येईल. या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधित विभाग करील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१४०३०११४५६१६२३१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

1/3/2014

(आर.विमला)
उप सचिव (रोहयो)

प्रति,

1) मा. राज्यपालांचे सचिव,

2) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
3) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
4) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
5) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
6) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
7) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
8) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) 1, महाराष्ट्र, मुंबई.
9) महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) 2, महाराष्ट्र, नागपूर.
10) महालेखापाल (लेखा परीक्षा) 1, महाराष्ट्र, मुंबई.
11) महालेखापाल (लेखा परीक्षा) 2, महाराष्ट्र, नागपूर.
12) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
13) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
14) वित्त विभाग (विनियम) (अर्थसंकल्प) व (व्यय-1).
15) सर्व विभागीय आयुक्त तथा रोजगार आयुक्त, मग्रारोहयो.
16) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
17) सर्व जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी.
18) सर्व सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
19) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (मग्रारोहयो).
20) सर्व उप जिल्हाधिकारी (रोहयो).
21) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
22) मुख्य अभियंता, ल. पा. (स्था. स्तर) पुणे.
23) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
24) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग.
25) प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
26) संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
27) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
28) उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई.
29) मुख्य अभियंता व सह सचिव (मग्रारोहयो).
30) सर्व उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (मग्रारोहयो प्रभाग) व जलसंधारण विभाग.
31) सर्व उप विभागीय अधिकारी (महसूल).
32) सर्व मंत्रालयीन विभाग.
33) वित्त विभाग/व्यय-8 शाखा, मंत्रालय, मुंबई-400 032
34) कक्ष अधिकारी, रोहयो- 1, सारसंग्रह,
35) निवडनस्ती, रोहयो- 10

---